# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्रमांक : २४६/२०१२

विद्यापीठ/महाविद्यालयीन/तंत्र/व्यवसायिक शिक्षक व प्रशिक्षण आणि कला क्षेत्रातील शिक्षकांना ''आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार'' प्रदान करण्याबाबत महाराष्ट्र राज्य निर्णय क्र. राशिपु—२०१२/ (१३९/१२)/समन्वय, दि. २६ डिसेंबर, २०१२ नुसार नव्याने जाहीर करण्यात आलेला आहे. ''आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार'' प्रदान करण्यासंदर्भात असलेले सर्व विद्यमान शासन निर्णय अधिक्रमित करुन पुरस्काराचे निकष व कार्यपध्दती निश्चित करुन शासन निर्णय प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णय सोबत जोडलेला आहे.

पुणे विद्यापीठक्षेत्रातील सर्व शिक्षकांना विनंती करण्यात येते की, सन २०१२—१३ च्या राज्य शिक्षक पुरस्कारासाठी वरील शासन निर्णयानुसार निकष व अटी पूर्ण करीत असलेल्या शिक्षकांकडून शनिवार, दि. ५ जानेवारी, २०१३ पर्यंत १० प्रतिंमध्ये प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. वर्ष २०१२—१३ करीता ''आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार'' निवडीचा कार्यक्रम सोबत जोडलेला आहे.

संचालक,
म. व वि. वि. मं.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : प.प्रवेश/५६७०
दिनांक : २९/१२/२०१२

विद्यापीठ / महाविद्यालयीन / तंत्र / व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण आणि कला क्षेत्रातील शिक्षकांना "आदर्श शिक्षक पुरस्कार" प्रदान करणेबाबत निकष - निवड व कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :-राशिपु -2012/(139/12)/समन्वय,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 400 032.
दिनांक :-26 डिसेंबर, 2012.

प्रस्तावना :- महाविद्यालयीन शिक्षण, विद्यापीठ शिक्षण, अभियांत्रिकी शिक्षण, व्यवसाय शिक्षण /प्रशिक्षण, चित्रकला /उपयोजित कला हया क्षेत्रात अध्ययन /अध्यापनासह शैक्षणिक क्षेत्रात समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या शिक्षकांचा यथोचित गौरव व्हावा, तसेच त्यांच्या कार्याची प्रेरणा इतर शिक्षकांना मिळावी या उदात्त हेतूने राज्यातील शिक्षकांचा प्रत्येक वर्षी दि.26 जानेवारी या प्रजासत्ताक दिनी आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार देऊन, शासनाकडून सन्मान करण्यात येतो.

02. आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराकरीता शिक्षकाची होणारी निवड अधिक पारदर्शक आणि गुणवत्तापूर्वक व्हावी. खऱ्या अर्थाने समर्पित भावनेने शैक्षणिक क्षेत्रात अध्ययन /अध्यापन करुन, मोलाचे योगदान देणाऱ्या शिक्षकांची निवड उक्त पुरस्काराकरीता व्हावी ; ही सर्वसामान्यांची इच्छा प्रतिबिंबीत होण्याकरीता या निवड प्रक्रियेच्या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेले नियम, निकष, निवड प्रक्रिया इत्यादिमध्ये सुधारणा करुन, अद्ययवत नियमावलीबाबतचे शासन निर्णय प्रसिद्ध करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

03. शासन निर्णय:- उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन, शासन या आदेशाद्वारे, आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्रदान करण्याच्या संदर्भात अस्तित्वात असलेले सर्व विद्यमान शासन निर्णय अधिक्रमित करुन, पुरस्काराचे निकष आणि कार्यपद्धती निश्चित करुन, सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध करीत आहे.

04. आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारांची एकूण संख्या 31 राहील आणि त्याची विगतवारी खालीलप्रमाणे राहील -

| संचालनालय /विद्यापीठ नांव (1) | पुरस्काराचे क्षेत्र (2) | पुरस्कारांची संख्या (3) |
|---|---|---|
| 1) मुंबई विद्यापीठ<br>2) पुणे विद्यापीठ<br>3) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ<br>4) एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.<br>5) सोलापूर विद्यापीठ<br>6) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.<br>7) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.<br>8) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ<br>9) स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड<br>10) संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती<br>11) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक<br>12) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | प्रत्येक विद्यापीठांतर्गत येणारी पारंपारिक महाविद्यालये (खाजगी (अनुदानित / विनाअनुदानित) येथील शिक्षकांकरीता. | प्रत्येक विद्यापीठाकरीता प्रत्येकी 01 |
| उच्च शिक्षण संचालनालय | राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासकीय शैक्षणिक संस्था, अध्यापक महाविद्यालये येथील शिक्षकांकरीता. | 01 |
| तंत्र शिक्षण संचालनालय | राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये, स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रविद्यापीठ, लोणेरे येथील शिक्षकांकरीता. | 02 |
| तंत्र शिक्षण संचालनालय | राज्यातील सर्व शासकीय तंत्रनिकेतने, स्वायत्त तंत्रनिकेतने येथील शिक्षकांकरीता. | 03 |
| औद्योगिक प्रशिक्षण संस्था (I.T.I) | औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) येथील शिक्षकांकरता महसूल विभाग निहाय (प्रत्येकी एक ) | 06 |

| | | |
|---|---|---|
| व्यवसाय शिक्षण संचालनालय (तंत्रशाळा) | तंत्र शाळेतील शिक्षकांकरिता महसुल विभाग निहाय (प्रत्येकी एक) | 06 |
| कला शिक्षण (चित्रकला /उपयोजित कला) संचालनालय | राज्यातील शासकीय व अनुदानित चित्रकला /उपयोजित कला महाविद्यालये येथील शिक्षकांकरीता. | 01 |
| | एकूण | 31 |

05. <u>पुरस्काराकरीता प्राथमिक अटी :-</u> खालील अटी पूर्ण करणारे शिक्षक, राज्य शिक्षक पुरस्काराकरीता अर्ज करण्यास /प्रस्ताव पाठविण्यास पात्र राहतील.

(एक) शासनाने विहीत केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार नियुक्ती झालेले शिक्षक.

(दोन) शिक्षकाने नियमित वर्ग अध्यापनाचे कार्य केलेले असावे. अध्यापनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात प्रतिनियुक्तीवर गेलेले /प्रतिनियुक्तीवर आहेत असे शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेचे प्राचार्य / मुख्याध्यापक / अधिष्ठाता / संचालक देतील.

(तीन ) शिक्षकाने कमीत कमी 15 वर्षांची अध्यापन सेवा केलेली असावी, याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेचे प्राचार्य / मुख्याध्यापक / अधिष्ठाता / संचालक देतील.

(चार) आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक, पुन:श्च अशा पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत. तसेच सेवानिवृत्त झालेले शिक्षक पात्र राहणार नाहीत. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेचे प्राचार्य / मुख्याध्यापक / अधिष्ठाता / संचालक देतील.

(पाच) विभागीय चौकशीत दोषी आढळलेले, विभागीय चौकशी प्रलंबित असलेले शिक्षक पुरस्कारासाठी अपात्र राहतील. याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेचे प्राचार्य /मुख्याध्यापक / अधिष्ठाता /संचालक देतील.

(सहा) शिक्षकाविरुद्ध फौजदारी कारवाईत शिक्षा झालेली नसावी, तसेच पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा. तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षक देतील.

सात) शिक्षक खाजगी शिकवणी करीत नसावा, तसे प्रतिज्ञापत्र संबंधित शिक्षक देतील.

(आठ) प्राथमिक अटींचा भंग झाल्यास, पुरस्कार व त्याअनुषंगिक सोयी-सुविधा परत घेण्यात येतील व संबंधितांवर उचित कारवाई करण्यात येईल.

06. पुरस्कारार्थी निवड करण्याकरीता निकष :- परिच्छेद क्र.05 येथे नमूद केलेल्या प्राथमिक अटीं पूर्ण करणाऱ्या शिक्षकांचेच प्रस्ताव, आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार निवडीसाठी विचारात घेण्यात येतील. त्याकरीता निकष खालीलप्रमाणे राहतील -

अ) महाविद्यालये /विद्यापीठ /अध्यापक महाविद्यालये /विज्ञान संस्था /न्याय सहाय्य विज्ञान संस्था / <u>अभियांत्रिकी महाविद्यालये / तंत्रनिकेतने येथील</u> शिक्षकांकरीता राज्य शिक्षक पुरस्काराचे <u>निकष :</u>

| निकष | मुल्यांकनाची पद्धती | गुणांकन |
|---|---|---|
| 1. शिक्षकाने त्याच्या विषयात शोध निबंध प्रकाशित केलेले असावेत. | याबाबतची प्रमाणित कागदपत्रे प्रस्तावासोबत असावीत व ती कुलगुरुंनी प्रमाणित करावीत. | 20 |
| 2. विद्यार्थी आणि महाविद्यालय यांच्या विकासाकरिता राबविलेले उपक्रम | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | 20 |
| 3. शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे मागील 5 वर्षातील प्रमाण (80 % जास्त असल्यासच गुण मिळतील) | सदर माहिती संबंधित विभागप्रमुख प्रमाणित करतील. | 20 |
| 4. पी.एच.डी. किंवा नेट-सेट उत्तीर्ण झालेले असल्यास, | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | 5 |
| 5. किमान 2 विद्यार्थ्यांना पी.एच.डी. मार्गदर्शक म्हणून काम केलेले असावे | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | 5 |
| 6. शिक्षकाने त्याच्या अद्यापनक्षेत्रामध्ये केलेले संशोधनपर कार्य, शोधनिबंध व त्याची प्रसिद्धी | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | 15 |
| 7. आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये सादर /प्रसिद्ध केलेले संशोधनपर पेपर्स | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित कुलगुरु / संचालक प्रमाणित करतील. | 15 |

<u>ब) व्यवसायशिक्षण अंतर्गत तंत्रशाळा आणि व्यवसाय प्रशिक्षण अंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) येथील शिक्षकांकरीता राज्य शिक्षक पुरस्काराचे निकष :</u>

| निकष | मुल्यांकनाची पद्धती | गुणांकन |
|---|---|---|
| 1. शिक्षकाने त्याच्या व्यवसायाशी संबंधित किमान 10 प्रकल्प अहवाल (Project Report) सादर केलेले असावेत | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 25 |
| 2. शिक्षक अद्यापन करीत असलेल्या विषय / व्यवसाय विद्यार्थ्यांना व्यवस्थितरित्या आकलन व्हावा म्हणून त्याने राबविलेले उपक्रम | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 25 |
| 3. व्यवसाय / योजनेची प्रसिद्धी, प्रचार व प्रसाराबाबत व्यक्तिगत पातळीवर केलेले उल्लेखनीय काम, तसेच भरती मेळाव्यासंदर्भातील व्यक्तिगत सहभाग / प्रयत्न | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 20 |
| 4.व्यवसायाशी संबंधित किमान 2 पेपर्स प्रसिद्ध झालेले असावेत | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 10 |
| 5. शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांच्या उत्तीर्णतेचे मागील 5 वर्षातील प्रमाण (80 % जास्त असल्यासच गुण मिळतील) | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 10 |
| 6. शिक्षकाच्या अध्यापन विषयात उत्तीर्ण होऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना उपलब्ध होणाऱ्या रोजगार / स्वयंरोजगाराच्या संधी याबाबत शिक्षकाने स्वत: तयार केलेला माहिती अहवाल | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 10 |

**क) चित्रकला /उपयोजित कला महाविद्यालयातील शिक्षकांकरीता राज्य शिक्षक पुरस्काराचे निकष :**

| निकष | मुल्यांकनाची पद्धती | गुणांकन |
|---|---|---|
| 1. चित्रकला /उपयोजित कला विकासासाठी केलेले कार्य | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 30 |
| 2. राष्ट्रीय / राज्यस्तरावर आयोजित कला प्रदर्शनात प्रदर्शित केलेली कला | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 15 |
| 3. शिक्षकाच्या अध्यापन विषयातील विद्यार्थ्यांच्या कला | याबाबतची माहिती संबंधित | 15 |

| | | |
|---|---|---|
| क्षेत्रातील यशस्वीततेची उदाहरणे (मार्गदर्शन इ. अनुषंगाने) | शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | |
| 4. आंतरराष्ट्रीय / राष्ट्रीय सेमिनारमध्ये प्रसिद्ध केलेले संशोधनपर पेपर्स | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 10 |
| 5. स्वत:च्या विषयाशी संबंधित 2 दर्जेदार कलासाहित्य प्रकाशित झालेले असावेत | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 10 |
| 6. शिक्षक शिकवित असलेल्या कला विषयात विद्यार्थ्यांच्या प्रवेश क्षमतेनुसार सर्व प्रवेश होतात का? व प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी (गळती न होता) नियमित पदवी संपादन करुन बाहेर पडतात का? | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 10 |
| 7. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासंदर्भात तसेच कलेच्या प्रचार, प्रसारासाठी शिक्षकाने केलेली उल्लेखनीय कामगिरी | याबाबतची माहिती संबंधित शिक्षक सादर करतील व ती संबंधित संचालक प्रमाणित करतील. | 10 |

**07. प्राथमिक अटी व निकष यांचे पालन करणाऱ्या शिक्षकांनाच आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार देण्यात येतील. एखाद्या वर्षी प्राथमिक अटी व निकषांची पूर्तता होत नसल्यास, त्या वर्षी त्या प्रवर्गात पुरस्कार दिला जाणार नाही.**

**08. आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराचे प्रस्ताव तयार करण्याची पद्धती.**

(एक) संचालक व विद्यापीठांचे कुलगुरु सदर पुरस्कार निवडीसाठी महाराष्ट्र राज्यातील वर्तमानपत्रात प्रत्येक वर्षाच्या जुलै महिन्यात त्या वर्षाच्या पुरस्कारासाठी जाहिरात देऊन व त्यांच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालयाकरीता परिपत्रक निर्गमित करुन, व्यापक प्रसिद्धी देतील आणि पुरस्कारासाठी अर्ज मागवितील.

(दोन) पुरस्कार इच्छुक शिक्षक अथवा एखाद्या शिक्षकाकरीता शिफारस करणाऱ्या संस्था त्यांचे प्रस्ताव, शासन निर्णयात विहित केलेल्या कार्यपद्धतीने तयार करुन, असे शिक्षक जेथे कार्यरत आहेत त्या शिक्षण संस्था प्रमुखांच्यामार्फत (प्राचार्य /मुख्याध्यापक /संचालक

इत्यादि) संबंधित विद्यापीठ आणि संचालक यांच्याकडे, सादर करतील. तसेच, राज्यातील सर्व शासकीय पारंपारिक महाविद्यालये /अध्यापक महाविद्यालये /शासकीय शिक्षण संस्था येथील शिक्षकांचे प्रस्ताव, असे शिक्षक जेथे कार्यरत आहेत त्या शिक्षण संस्था प्रमुखांच्यामार्फत (प्राचार्य /मुख्याध्यापक /संचालक इत्यादि) संबंधित विद्यापीठाकडे पाठवतील.

(तीन) प्रत्येक प्रस्ताव हा शिक्षकनिहाय स्वतंत्र राहील. प्रस्तावाच्या सुरुवातीची पृष्ठे, शिक्षकाची वैयक्तिक माहिती (उदा. शिक्षकाचे नाव, संस्थेचे नाव, जन्मतारीख (वय), शैक्षणिक पात्रता, प्रथम नियुक्तीचा दिनांक, सेवेचा कालावधी इत्यादिबाबतच्या कागदपत्राची राहतील. प्रस्तावात त्यानंतरची पृष्ठे शिक्षकाने प्राथमिक अटी पूर्ण केल्याची प्रमाणपत्रासह क्रमवार कागदपत्रं असतील. प्रस्तावातील त्यानंतरची पृष्ठे त्या-त्या पुरस्काराकरिता जे निकष विहीत केलेले आहेत, त्याची पूर्तता आणि त्याबाबतची प्रमाणित कागदपत्राची असतील.

(चार) प्रत्येक संचालनालय आणि प्रत्येक विद्यापीठ यांच्याकडे प्राप्त होणारे सर्व प्रस्ताव, संचालक आणि विद्यापीठाचे कुलगुरु त्यांच्यास्तरावर गठीत करण्यात आलेल्या छाननी समितीपुढे ठेवतील व छाननी समिती तपासून, मुल्यांकन करील. विद्यापीठाकडे दोन प्रकारचे प्रस्तात येतील. (1) विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पारंपारिक महाविद्यालये (अनुदानित /विनाअनुदानित /खाजगी) आणि (2) विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय महाविद्यालये, अध्यापक महाविद्यालये आणि शासकीय शिक्षण संस्था येथील शिक्षकांचे प्रस्ताव. असे दोन्ही प्रकारचे प्रस्ताव, संबंधित कुलगुरु त्यांच्या स्तरावर गठित झालेल्या छाननी समितीपुढे स्वतंत्रपणे ठेऊन, स्वतंत्रपणे तपासून, मुल्यांकन करतील.

09. **छाननी समितीची रचना** - संचालक व विद्यापीठ स्तरावर छाननी समिती खालीलप्रमाणे राहील. छाननी समिती गठीत करण्याची कार्यवाही संचालक आणि विद्यापीठ प्रत्येक वर्षी (जुलै महिन्याअखेरपर्यंत) करतील.

**(अ) विद्यापीठ स्तरावरील छाननी समिती :-**

- कुलगुरु -- अध्यक्ष
- विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील नावाजलेल्या महाविद्यातील कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेचे प्राचार्य / विभागप्रमुख (प्रत्येकी एक) -- सदस्य
- विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) -- सदस्य
- विद्यापीठाचे कुलसचिव -- सदस्य सचिव

(ब) **व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, छाननी समिती :-**

- संचालक व्यवसाय शिक्षण -- अध्यक्ष
- सह संचालक (प्रशिक्षण) -- सदस्य
- संचालनालयाच्या कार्यक्षेत्रातील दोन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नियमित प्राचार्य (फिरत्या पध्दतीने) -- सदस्य
- संचालनालयाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय तंत्रशाळेचे नियमित प्राचार्य (फिरत्या पध्दतीने) -- सदस्य
- संचालनालयातील (मुख्यालय) सहसंचालक -- सदस्य सचिव

(क) **तंत्रशिक्षण संचालनालय, छाननी समिती :-**

- संचालक -- अध्यक्ष
- संचालनालयाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय विना अनुदानित/ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रत्येकी एक नियमित प्राचार्य (फिरत्या पध्दतीने) -- सदस्य
- व्ही.जे.टी.आय. चे संचालक -- सदस्य
- स्वायत अभियांत्रिकी महाविद्ययातील एका महाविद्यालयाचे नियमित प्राचार्य (फिरत्या पध्दतीने) -- सचिव
- संचालनालय (मुख्यालय) सहसंचालक (प्रशासन) -- सदस्य सचिव

(ड) **कला संचालनालय, छाननी समिती :-**

- संचालक -- अध्यक्ष
- ज.जी. कला महाविद्यालय आणि शासकीय कला महाविद्यालय, नागपूर यांचे नियमित प्राचार्य -- सदस्य
- राज्यातील अनुदानित दोन कला महाविद्यालयाचे नियमित प्राचार्य -- सदस्य
- संचालनालय (मुख्यालय) मधील प्रशासन अधिकारी -- सदस्य सचिव

10. **छाननी समितीचे कार्य आणि जबाबदारी :-** या शासन निर्णयात विहीत करुन दिलेल्या प्राथमिक अटी प्रत्येक प्रस्तावात पूर्ण झालेले आहेत. याची तपासणी छाननी समिती करील. प्राथमिक अटी पूर्ण करणारे प्रस्तावच, असा प्रस्ताव ज्या पुरस्काराकरीता असेल, त्या पुरस्काराकरीता विहीत केलेल्या निकषांकरीता छाननी समिती विचारात घेईल. पुरस्कारासाठी निश्चित केलेले निकष, प्रस्तावात पूर्ण झालेले आहेत. याची तपासणी छाननी समिती करील आणि सत्यता तपासून, या शासन निर्णयात विहित केलेल्या पद्धतीने प्रत्येक निकषाचे गुणांकन करुन, पुरस्काराची गुणवत्ता यादी छाननी समिती तयार करील. विद्यापीठाकडे प्राप्त होणारे, शासकीय पारंपारिक महाविद्यालये, अध्यापक महाविद्यालये आणि शासकीय शैक्षणिक संस्था येथील शिक्षकांच्या प्रस्तावांची गुणवत्ता यादी विद्यापीठस्तरावरील छाननी समिती स्वतंत्रपणे करील. छाननी समितीने तयार केलेली पुरस्कारनिहाय गुणवत्ता यादी आणि छाननी समितीच्या बैठकीचे कर्यवृत्त याची प्रत्येकी एक प्रत प्रत्येक वैयक्तिक प्रस्तावाच्या नस्तीत छाननी समिती ठेवील. छाननी करुन, गुणांकन केलेल्या प्रत्येक प्रस्तावाच्या दहा प्रती; राज्य निवडसमिती पुढे ठेवण्याकरिता, प्रत्येक वर्षाच्या

नोव्हेंबर महिन्याअखेरपर्यंत शासनाकडे, छाननी समिती सादर करील. प्रत्येक प्रस्ताव Spiral Binding स्वरुपात राहील. दुसरी प्रत संचालक /कुलगुरु त्यांच्या दफतरी जतन करुन ठेवतील.

11. **पुरस्कारांर्थीची अंतिम निवड करण्याकरीता राज्य निवड समिती - रचना :-** आदर्श राज्य शिक्षक पुरस्कारर्थींची अंतिम निवड करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय निवड समिती राहील -

राज्यस्तरीय निवडसमिती

| | |
|---|---|
| 1) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण | -- अध्यक्ष |
| 2) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण | -- उपाध्यक्ष |
| 3) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग | -- सदस्य |
| 3) राज्यातील दोन मान्यवर शिक्षण तज्ञ | -- सदस्य |
| 4) सह सचिव (प्रशासन), उच्च व तंत्र शिक्षण विभाग | -- सदस्य |
| 5) संचालक, उच्च शिक्षण | -- सदस्य-सचिव |

12. **राज्य शिक्षक पुरस्कार निवड प्रक्रियेचा प्रत्येक वर्षाचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील -**

| अ.क्र. | कार्यक्रम | | मुदत /कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | राज्य शिक्षक पुरस्कार प्रस्ताव /अर्ज मागविण्यासाठी, संचालक /कुलसचिव यांनी वर्तमानपत्रात जाहिरात देणे व सर्व क्षेत्रीय कार्यालयासाठी परिपत्रक निर्गमित करणे. | : | दि.01 जुलै. |
| 2 | प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची अंतिम तारीख | : | दि.31 जुलै. |
| 3 | संचालक आणि कुलसचिव यांनी प्राप्त प्रस्ताव /अर्ज शासन निर्णयातील प्राथमिक अटी तपासून, प्रमाणित करुन शिक्षकनिहाय प्रस्ताव तयार करुन, छाननी समितीपुढे ठेवणे. | : | दि.30ऑगस्ट पर्यंत. |
| 4 | छाननी समितीने प्रस्ताव शासनाकडे /राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करणे. | : | दि.31 ऑक्टोबर पर्यंत. |
| 5 | राज्यस्तरीय निवड समितीची सभा आयोजित करणे. | : | डिसेंबर |
| 6 | राज्य शिक्षक पुरस्कार जाहिर करणे | : | दि.26 जानेवारी |
| 7 | राज्य शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा | : | दि.05 सप्टेंबर |

13. **पुरस्काराचे स्वरुप :-** पुरस्कार प्राप्त करणाऱ्या प्रत्येक पुरस्ककारार्थींना, रु.10,000/- रोख, शाल, श्रीफळ आणि राज्यस्तरीय समितीचे अध्यक्ष /उपाध्यक्ष यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र असे राहील.

हा शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र.201212271431256308असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(बा.म.राऊत)

अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,

1. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
2. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
3. मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
4. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
5. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
6. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
7. मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
8. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु
9. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई. (व्यापक प्रसिध्दीसाठी)
10. सर्व सहसचिव/उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
11. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व संचालनालयाचे संचालक.
12. अवर सचिव/कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
13. महालेखापाल, (लेखा परिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
14. निवड नस्ती (समन्वय).

"

महाराष्ट्र शासन

क्र.राशिपु-
2012/प्र.क्र.139/समन्वय
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - 400 032.
दिनांक:- 26 डिसेंबर, 2012.

प्रति,

सर्व विद्यापीठांचे कुलगुरु,

संचालक, उच्च शिक्षण /तंत्र शिक्षण, व्यवसाय शिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण व कला

विषय :- आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार सन 2012-2013.
संदर्भ :- शासन निर्णय क्र.राशिपु-2012 /प्र.क्र.139 /समन्वय, दि.26 डिसेंबर, 2012.

महोदय,

आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यासंदर्भात विद्यमान सर्व शासन निर्णय अधिक्रमित करुन, संदर्भाधिन शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. **(प्रत सोबत तात्काळ संदर्भासाठी जोडलेली आहे.)** वर्ष 2012-2013 चे पुरस्कार निवडीची प्रक्रियासुद्धा संदर्भाधिन शासन निर्णयानुसार करावयाची आहे.

सन 2012-13 चे शिक्षक पुरस्कार दि.26 जानेवारी, 2013 रोजी जाहिर करावयाचे आहेत. त्या अनुषंगाने सर्व प्रक्रिया अत्यंत जलदगतीने होणे आवश्यक आहे. म्हणून खालीलप्रमाणे वेळापत्रक केवळ ह्या वर्षाकरीता निश्चित करुन, देण्यात येत आहे. सन 2012-13 चे आदर्श राज्य शिक्षक पुरस्काराची निवड प्रक्रिया संदर्भाधिन शासन निर्णय विचारात घेऊन, खाली निश्चित करुन दिलेल्या कार्यक्रमानुसार विहित वेळेत पूर्ण करावी. या पुरस्काराकरीता यापूर्वी प्राप्त झालेले प्रस्तावसुद्धा विचारात घेण्यात यावेत. मात्र कोणत्याही परिस्थितीत निश्चित करुन दिलेल्या कार्यक्रमानुसार प्रस्ताव राज्यस्तरीय समितीपुढे सादर करण्याची जबाबदारी प्रत्येक स्तरावरील छाननी समितीच्या अध्यक्षांची राहील.

**वर्ष 2012-2013 करीता आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार निवडीचा कार्यक्रम**

| अ.क्र. | कार्यक्रम | | मुदत /कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | राज्य शिक्षक पुरस्कार प्रस्ताव /अर्ज मागविण्यासाठी, संचालक /कुलसचिव यांनी वर्तमानपत्रात जाहिरात देणे व सर्व क्षेत्रीय कार्यालयासाठी परिपत्रक निर्गमित करणे. | : | दि.26 डिसेंबर, 2012 |
| 2 | प्रस्ताव प्राप्त करुन घेण्याची अंतिम तारीख | : | दि.05 जानेवारी, 2013. |
| 3 | संचालक आणि कुलसचिव यांनी प्राप्त प्रस्ताव /अर्ज शासन निर्णयातील प्राथमिक अटी तपासून, प्रमाणित | : | दि.10 जानेवारी, 2013. |

| | | | |
|---|---|---|---|
| | करुन शिक्षकनिहाय प्रस्ताव छाननी समितीकडे पाठविणे | | |
| 4 | छाननी समितीने प्रस्ताव शासनाकडे /राज्यस्तरीय निवड समितीकडे सादर करणे. | : | दि.15 जानेवारी, 2013. |
| 5 | राज्यस्तरीय निवड समितीची सभा आयोजित करणे. | : | दि.16 ते 24 जानेवारी, 2013 दरम्यान |
| 6 | राज्य शिक्षक पुरस्कार जाहिर करणे | : | दि.26 जानेवारी, 2013. |
| 7 | राज्य शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा | : | दि.05 सप्टेंबर, 2013. |

) ( बा.म.राऊत

शासन अवर सचिव, महाराष्ट्र